ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 8 | APRIL - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मराठीतील साठोत्तरी आत्मचरित्र : एक दृष्टिक्षेप

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर.

## प्रास्ताविक :




मराठी साहित्यामध्ये चरित्र—आत्मचरित्र लेखन हे आधुनिक कालखंडापासून मोठ्या प्रमाणावर होऊ लागलेले आहे. तसे चरित्र लेखनाची खूप मोठी परंपरा मराठी साहित्यात असलेली दिसून येते. परंतु आत्मचरित्रात्मक लेखन मात्र आधुनिक कालखंडापासून होऊ लागलेले आहे. प्रारंभीच्या काळात अनुवादाच्या स्वरूपात आलेली आत्मचरित्र पुढे पुढे मात्र स्वतंत्ररीत्या मराठीमध्ये लिहिली गेली आहेत. इंग्रजी साहित्यातून प्रेरणा घेऊन मराठीमध्ये रूढ झालेला Autobiography हा साहित्यप्रकार आत्मचरित्र या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. आत्मचरित्र ही काळाला, विचाराला, संस्कृतीला आणि तत्कालीन जीवन व्यवस्थेला प्रवाही ठेवणारी असतात. अशा आत्मचरित्र लेखनाची परंपरा साठोत्तरी कालखंडात अधिकाधिक विकसित झालेली पहावयास मिळते.

साठोत्तरी कालखंड हा एकूणच मराठी साहित्याच्या सर्वांगात अमुलाग्र बदल करणारा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात मराठीमध्ये आत्मचरित्र लेखकांची मोठी भर पडलेली दिसून येते. अनेक लेखक आयुष्याच्या उतारवयात आपल्या जीवनानुभवांना अभिव्यक्त करताना दिसून येतात. या साठोत्तरी आत्मचरित्रात्मक लेखनाचा चिकित्सक विचार प्रस्तुत शोधनिबंधाच्या रूपाने या ठिकाणी मांडता येईल.

आत्मचरित्रकार आयुष्याच्या उतरणीच्या एखाद्या टप्प्यावर मागे वळून पाहताना आयुष्यात घडून गेलेल्या सुख—दु:खांच्या आठवणींची कळत नकळत झालेली घालमेल आपल्या आत्मचरित्रातून साकार करीत असतात. आत्मचरित्रकार आपल्या लेखनातून स्वत:चा शोध घेत असतात. बरोबरीनेच ते समकालीन जीवनवास्तवाचा शोध घेतात. म्हणजेच आत्मचरित्र या साहित्य प्रकारात एकात्मकतेबरोबर अनेकात्मकताही दिसून येते. खरेतर हे काम खूप अवघड आहे, परंतु या लेखन प्रकारातून अनेकांनी ही कला साध्य केल्याचे दिसून येते. लेखकाच्या या आत्मचरित्रात्मक लेखन प्रक्रियेतून साकार झालेल्या लेखन स्वरूपाला अधोरेखित करताना जयंत वष्ट लिहितात,''स्वत: लेखकच लेखन कृतीचा विषय असल्याने तेथे एकसंधतेसह अलिप्तता ही साधण्याचा प्रयत्न करावयाचा असतो आणि त्याचबरोबर व्यक्तित्वाची प्रसंगोप्रसंगी परिस्थितीशी झालेली क्रिया प्रतिक्रियाही नोंदवायचे असते. अर्थात हे लेखन म्हणजे केवळ हकीकत नसते वा तो स्वत:वरचा प्रबंध ही नसतो. तर सजीव, एकरूप आणि कलात्मक अशी ही गतीशील लेखन कृती असते. त्यातून स्वत:ला व समाजास बोध व पुन:प्रत्ययाचा आनंद ही द्यावयाचा असतो. हे सारे अवघड असते तरीही यातून काहीतरी अनुकरणीय आहे, असे वाटावे अशी अपेक्षाही

लेखकाच्या अंतरंगात कुठेतरी दडलेली असते.''[१] जयंत वष्ट यांनी आत्मचरित्रिकार आपल्या लेखनाची रचना कशा पद्धतीने करतो हे सिद्ध करून आत्मचरित्र हे केवळ लेखकापुरतेच मर्यादित राहात नाही तर ते समाजासही बोध करण्यास तयार असते हे स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात लिहिली गेलेली अनेक आत्मचरित्रे या अर्थाने महत्त्वाची ठरतात.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण व्यवस्था अधिकाधिक गतिमान झाल्यामुळे समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातील लोक शिकू लागले आणि शिक्षणाने आत्मभान आलेल्या लेखकांनी आपल्या सभोवतालच्या जीवन विश्वातून आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब आपल्या शैलीत द्वारा प्रकट करण्यास प्रारंभ केला आणि आत्मपर लेखन मोठ्या प्रमाणात होऊ लागले. आत्मचरित्र, आत्मकथा, आत्मचरित्रात्मक कादंबरी आणि त्याचबरोबर स्वत:चे भावविश्व रेखाटणाऱ्या अनेक कथाही या कालखंडात लिहिल्या गेलेल्या आहेत. या एकूणच आत्मलेखनातील आत्मचरित्र या साहित्य प्रकारात झालेले लेखन विपुल प्रमाणात नसले तरी महत्त्वपूर्ण नक्कीच आहे. आत्मचरीत्र लिहीणे ही तशी सोपी गोष्ट नाही. कारण सत्य केंद्रस्थानी ठेवून आपल्या जीवनविश्वाला अधोरेखित करताना लेखकाची कोंडी होण्याची खूप मोठी शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आत्मस्तुती होण्याचीही शक्यता आत्मचरित्रात मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. त्यामुळेच तटस्थ राहून आपल्या जीवनाला साकार करणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी असत नाही. मी पासून सुरु होणारा प्रवास मी पर्यंत संपने म्हणजेच आत्मचरीत्र लिहीणे. अशी आत्मचरित्रकाराची भूमिका असते. आत्मचरित्रकाराच्या या दृष्टिकोनाला अधिक सखोलतेने स्पष्ट करणारी अनेक आत्मचरित्रे स्वातंत्र्योत्तर काळात लिहिली गेलेली आहेत. समाजाच्या वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात आपले अस्तित्व सिद्ध करणाऱ्या अनेक मान्यवर साहित्यिकांनी आत्मचरित्रात्मक लेखनात मौलिक स्वरूपाची भर घातलेली आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक, वैज्ञानिक, सिनेसृष्टी आदी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर लेखकांनी आत्मचरित्रात्मक लेखनातून आपल्या जीवनाची अनुभूती शब्दबध्द केलेली दिसून येते. या कालखंडात एकूणच साहित्यविषयक मनोभूमिका अमुलाग्र स्वरूपात बदललेली होती. त्याचे प्रत्यंतर या कालखंडातील साहित्य निर्मितीतून अनुभवास येते. एकूणच समाजाच्या संरचनेवर आणि समाजांतर्गत स्तरांवर प्रभाव गाजवणारा विचार या कालखंडातील साहित्य लेखनातून कळत नकळत डोकावला गेला आहे. नवे प्रमेय घेऊन साकार होणारीच आत्मचरित्रेही या पासून वेगळी करता येत नाहीत. या कालखंडातील एकूण साहित्य लेखनाच्या विविधात्मकतेला शब्दबद्ध करताना डॉ.रवींद्र शोभणे लिहितात, ''स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतरचा महत्त्वाचा कालखंड म्हणून साठोत्तरी कालखंडाचा विचार करावा लागतो. केवळ वेगळा कालखंड म्हणून व इसवीसन बदलण्याचा एक टप्पा म्हणून या वा स्वातंत्र्योत्तर काळाचा विचार करता येत नाही. तर याबद्दल त्या टप्प्यावर वाङ्मयीन वृत्त्यंतराचे मोठे पडसाद काळाच्या पटलावर उमटलेले आहेत असे दिसते. स्वातंत्र्योत्तर साहित्य म्हणजे नवसाहित्य असे अनुमान काढावे लागते. तसेच नवसाहित्य तर कालखंड म्हणूनच केवळ साठोत्तरी कालखंडाचा विचार करता येत नाही, तर या कालखंडात साहित्यविषयक प्रकृतीमध्ये, वैचारिक प्रक्रियेमध्ये आणि सामाजिक अभिसरणात जे बदल घडून आलेत त्या बदलांचा स्वीकार करणारे आणि त्या अनुषंगाने साहित्यविषयक व समाजविषयक नव्या प्रमेयांची मांडणी करणारे हे साहित्य होते असे म्हणावे लागेल.''[२] शोभणे यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडाविषयी विशेषत: साठोत्तरी साहित्याच्या संदर्भात जे विवेचन केले आहे, त्यावरून बदलत्या साहित्यविश्वाला या कालखंडातील लेखकांनी आत्मसात करून आपले लेखन सिद्ध केले आहे याच पार्श्वभूमीवर आत्मचरित्रात्मक लेखनाचाही विचार होणे महत्त्वाचे वाटते.

आत्मचरित्रकार 'मी बरोबर आम्ही' या संकल्पनेतून आपल्या लेखनविश्वाला रेखाटताना मी च्या सभोवताली साकार झालेले भावविश्व प्रकट करीत राहतो. या 'मी' ची अभिव्यक्ती करत असताना सत्याच्या कसोटीवर आत्मचरित्र जसेच्या तसे उतरेल याची शाश्वती मात्र देता येत नाही. लेखकाच्या आत्मचरित्रात्मक लेखनातून येणाऱ्या या 'मी' च्या अनुषंगाने द.न.गोखले यांनी मांडलेला विचार या ठिकाणी महत्त्वाचा ठरतो ते म्हणतात,''आत्माविष्कार याचा वेगळा उल्लेख नाही हे खरे आहे, पण आत्मचरित्रात ऐतिहासिक सत्याला प्राण स्वरूप आहे. या विधानात आत्माविष्काराला सर्वोच्च महत्त्व आहे. हे विधान अंतर्भूत आहे. आत्मचरित्रात लेखक स्वत:चा वृत्तांत सांगतो आणि तो वृत्तांत ऐतिहासिक सत्य

प्रमाण स्वरूप असला पाहिजे असे म्हटले की, आत्माविष्कार याचा उल्लेख पर्यायाने होतोच आणि त्याला आज सर्वोच्च महत्त्वही येतेच.

कोणत्याही चांगल्या आत्मचरित्रातील आत्माविष्काराला मी ची तीन रूपे कारणीभूत होतात. या तीन रूपांनाच आपण तीन 'मी' म्हणू. लेखक ज्याच्याविषयी लिहितो तोच पहिला 'मी' म्हटला तर, लेखक हा त्यात दुसरा 'मी' असतो. बेडेकरांच्या झाडावर म्हणूनच दोन पक्षी बसलेले आहेत. पहिल्या 'मी' कडे दुसरा 'मी' पाहत असतो आणि त्याच्या विषयी लिहित असतो, पण उत्तम आत्मचरित्रात तिसराही एक 'मी' असतो. पहिल्या 'मी' विषयी दुसरा 'मी' जे लिहितो त्यावर हा तिसरा 'मी' साहित्यदृष्ट्या हात फिरवतो किंवा त्याला शेवटचे रूप देतो.''[३] द.न.गोखले यांच्या या वरील विवेचनावरून आत्मचरित्रात्मक लेखनाचे अंतरंग कशा पद्धतीने सिद्ध होते हे स्पष्ट होते. साठोत्तरी कालखंडातील अनेक आत्मचरित्रे ही या लेखकांच्या 'मी' सभोवती वावरणारी अशीच आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात वेगवेगळ्या साहित्य प्रवाहात जशी आत्मचरित्रे लिहिली गेली. तसेच स्त्री–पुरुष, मध्यमवर्गीय, उच्चवर्गीय, वैद्यकीयक्षेत्र, उद्योगक्षेत्र, राजकारण अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी आत्मचरित्रातून आपल्या आठवणींना उजागर केलेले आहे. आत्मचरित्र या साहित्य प्रकाराला संकल्पनेत बांधताना रा.ग.जाधव म्हणतात,''आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे लेखकाने लेखन रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय.''[४] जाधव यांनी आत्मचरित्राची संकल्पना स्पष्ट करताना लेखकाच्या जीवन आणि व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे. त्यामुळेच साठोत्तरी कालखंडात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रातून वेगवेगळ्या जीवन क्षेत्राचा परिचय झालेला दिसून येतो. The conscious Oxford dictionary या डिक्शनरीतही आत्मचरित्राची आलेली व्याख्या विचारात घेता येते. ती अशी, ''the story of one's life written by one's life"[५] स्वत:च्या जीवनाची स्वत: सांगितलेली कहाणी म्हणजे 'आत्मचरित्र' होय. या व्याख्येतून ही लेखकाच्या आत्मप्रकटीकरणावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. म्हणूनच आत्मचरित्र लेखनात स्वत:ला अभिव्यक्त करणे हे महत्त्वाचे ठरते.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी आत्मचरित्रात्मक लेखनातून आपले जीवन विश्व लगडलेले आहे. 'माझी गेली बारा वर्षं' ना.भा.खरे, 'पथिक' न.वि.गाडगीळ, 'कऱ्हेचे पाणी' प्र.के.अत्रे, 'प्रथमपुरुषी एकवचनी' पु.भा.भावे, 'सर्व मंगल क्षिप्रा' ह.वि.मोटे, 'एका मुंगीचे महाभारत' गंगाधर गाडगीळ, 'कृष्णाकाठ' यशवंतराव चव्हाण, 'लेखक आणि माणूस' श्री.ना.पेंडसे, 'पानाआडचं फुल' आशालता सावे, 'संध्याकाळ' गजानन जागीरदार, 'बहुरूपी' नटवर्य चिंतामणराव, 'एक झाड दोन पक्षी' विश्राम बेडेकर, 'मी : एस.एम.' एस.एम.जोशी, 'नाच ग घुमा' माधवी देसाई, 'आहे मनोहर तरी' सुनीताबाई देशपांडे आदी अनेक आत्मचरित्र ही स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाची आत्मचरित्र म्हणून ओळखली जातात. या आत्मचरित्रातून लेखकांनी आपल्या जगण्याविषयीचे प्रांजळ निवेदन केलेले आहे. त्याचबरोबर अलिप्ततावाद स्विकारुन जगण्याविषयीचे वास्तववादी मुक्त प्रकट करण्याचा प्रयत्न आत्मचरित्रकारांनी केलेला आहे. या आत्मचरित्रातून जीवनाचा आलेखही तेवढ्याच कलात्मकतेने साकार करून आपल्या जीवनातील निवडक घटनांची मांडणी या आत्मचरित्रातून केलेली दिसून येते.

साठोत्तरी कालखंडात प्रारंभीच्या काळात आत्मचरित्रे मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली. परंतु, पुढे पुढे मात्र आत्मचरित्रात्मक लेखनात उदासीनता निर्माण झालेली दिसून येते. याची अनेक कारणे सांगता येतील. आत्मचरित्रात्मक लेखनात निर्माण झालेल्या या परिस्थितीविषयी भाष्य करताना जयंत वष्ट लिहितात,''जसजशी मनोरंजनवादी वृत्ती कमी होईल व नाट्यापेक्षा वास्तवतेच्या, सत्याच्या भावनेला मूल्य प्राप्त होईल व स्वत्व आणि भान राखून लेखन अधिक कलात्मकतेबरोबरच प्रामाणिक व प्रांजळतेकडे वळेल तेव्हाच विश्वसनीय समकालीन वृत्तांतसह स्वत:चे पापुद्रे दूर करून सेंदुरा शिवाय दिसणारी व्यक्तिमत्वे साहित्यात प्रकाशित होतील व खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्वांच्या विकासद्रव्यांनी आलेख नि:स्पृहपणे नोंदविले जातील. ही अपेक्षा व वास्तव यात असणारी दरी हळुहळू कमी होण्याची चिन्हे दिसत असली, तरी ती आजही आहे हे मान्य करावयास हवे. निदान भविष्यातील या वाङ्मयप्रकारातील लेखन अधिक सकस व अक्षरात वाढवले जाणारे होईल असे मानण्यास जागा आहे. हे समाधान या शतकाच्या

अखेरपर्यंत वाढते राहील असे वाटते.''[६] वष्ट यांनी आत्मचरित्रात्मक लेखनात निर्माण झालेला पोकळवाद स्पष्ट करून या स्वरूपाच्या साहित्यप्रकारातून सकस लेखन निर्माण होण्याची शक्यताही वर्तविली आहे. यावरून हे स्पष्ट दिसून येते की, आत्मचरित्रात्मक लेखन हे अलीकडच्या काळात अल्प स्वरूपात होत आहे. त्याचा विकास व विस्तार होणे काळाची गरज आहे.

## समारोप :

अशाप्रकारे सारांश रुपाने शेवटी सांगता येते की, मराठीमध्ये साठोत्तरी कालखंडात अनेक आत्मचरित्रे लिहिली गेली. परंतु काळ जसजसा गतिमान होत गेला तसतसे आत्मपर लेखन करण्याची प्रवृत्ती कमी कमी होत गेलेली आहे. नव्हे नव्हे तर आत्मचरित्रात्मक लेखन सदोष होऊ लागलेले आहे. या मर्यादा ओलांडून आत्मचरित्रात्मक लेखनाचे नवे आकाश मराठीमध्ये निर्माण होणे ही काळाची गरज आहे हे या ठिकाणी आवर्जून नोंद करावे असे वाटते.

## संदर्भ :

१. जयंत वष्ट, स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र, प्रदक्षिणा, खंड दुसरा, संपा.अनिरूध्द कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९१, पृ.३०५.
२. डॉ.रविंद्र शोभणे, त्रिमिती, विजय प्रकाशन,, नागपूर, प्र.आ.२०१३, पृ.९.
३. द.न.गोखले, चरित्र—चिंतन, मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ.२०००, प्रस्तावना, तेवीस.
४. रा.ग.जाधव, मराठी विश्वकोश, खंड १.२, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, प्रकाशित, पृ.११.
५. The Concise Oxford Dictionary of English Literature by London (2nf.0), 1970, Page No.36.
६. जयंत वष्ट, उ.नि.पृ.३१७.